भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

**(सन १९६९ चा अधिनियम क्रमांक १८)**

[१ जून १९९४ रोजी यथाविद्यमान]

# The Registration of Births and Deaths Act, 1969

**(Act No. 18 of 1969)**

[*As in force on the 1st June 1994*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००३

[किंमत : रु. ५.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ जून १९९४ रोजी यथाविद्यमान असलेला दि रजिस्ट्रेशन ऑफ बर्थस् अॅण्ड डेथस् अॅक्ट, १९६९ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक २, दिनांक २३ नोव्हेंबर १९९५ यात पृष्ठे ९० ते ९७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ नोव्हेंबर १९९५.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Ragistration of Births and Deaths Act, 1969 as on the 1st June 1994 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 6, dated 23rd November 1995 on pages 90 to97.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
dated 23rd November 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

## विशोधन अधिनियमांची यादी

१. १९८६ चा अधिनियम क्र. ४.

# जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले
### प्रारंभिक


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या व निर्वचन.

### प्रकरण २ रे
### नोंदणी आस्थापना

३. भारताचा महानिबंधक.

४. मुख्य निबंधक.

५. नोंदणी विभाग.

६. जिल्हा निबंधक.

७. निबंधक.

### प्रकरण ३ रे
### जन्म व मृत्यू यांची नोंदणी

८. जन्म व मृत्यू यांची नोंदणी कोणत्या व्यक्तींनी करणे आवश्यक.

९. मळथामधील जन्म व मृत्यू यांच्या संबंधातील विशेष उपबंध.

१०. जन्म व मृत्यू यांचे वृत्त कळवण्याचे आणि मृत्यूचे कारण प्रमाणित करण्याचे विवक्षित व्यक्तींचे कर्तव्य.

११. माहितीदाराने नोंद पुस्तकात सही करावयाची.

१२. नोंदणीतील नोंदीचे उतारे माहितीदारास द्यावयाचे.

१३. जन्म व मृत्यू यांची उशिरा झालेली नोंदणी.

१४. बालकाच्या नावाची नोंदणी.

१५. जन्म-मृत्यूंच्या नोंद पुस्तकातील नोंद दुरुस्त किंवा रद्द करणे.

### प्रकरण ४ थे
### अभिलेख व आकडेवारी ठेवणे

१६. निबंधकांनी विहित नमुन्यात नोंदपुस्तके ठेवावयाची.

१७. जन्म-मृत्यूची नोंदपुस्तके शोधून पाहणे.

१८. नोंदणी कार्यालयांची पाहणी.

१९. निबंधकांनी नियतकालिक प्रतिवेदने संकलनासाठी मुख्य निबंधकाकडे पाठवावयाची.

प्रकरण ५ वे

संकीर्ण

कलमे

२०. भारताबाहेरील नागरिकांच्या जन्म-मृत्यूंच्या नोंदणीसंबंधी विशेष उपबंध.

२१. जन्म किंवा मृत्यू यासंबंधीची माहिती मिळविण्याची निबंधकाची शक्ती.

२२. निदेश देण्याची शक्ती.

२३. दंड.

२४. अपराध आपसात मिटवण्याची शक्ती.

२५. खटल्यास मंजुरी.

२६. निबंधक आणि दुय्यम निबंधक यांना लोक सेवक मानावयाचे.

२७. शक्तींचे प्रत्यायोजन.

२८. सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

२९. हा अधिनियम, १८८६ चा अधिनियम ६ याला न्यूनकारी नाही.

३०. नियम करण्याची शक्ती.

३१. निरसन व व्यावृत्ती.

३२. अडचणींचे निवारण करण्याची शक्ती.

# जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

(१९६९ चा अधिनियम क्रमांक १८)

[ दिनांक १ जून १९९४ रोजी यथाविद्यमान ]

**जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीचे विनियमन करण्याबाबत व त्याच्याशी निगडित असलेल्या बाबींसंबंधी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण १ले

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो राज्यामध्ये अंमलात येईल :

परंतु, राज्याच्या निरनिराळ्या भागांकरिता निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या व निर्वचन.

(क) "जन्म" याचा अर्थ, जिवंत अवस्थेतील जन्म किंवा मृतावस्थेतील जन्म, असा आहे ;

(ख) "मृत्यू" याचा अर्थ जिवंत अवस्थेत जन्म झाल्यानंतर कोणत्याही वेळी जिवंतपणाची सर्व लक्षणे कायमची नाहिशी होणे, असा आहे ;

(ग) "गर्भमृत्यू" याचा अर्थ, धारणगर्भ मातेच्या उदरातून संपूर्णपणे बाहेर पडण्यापूर्वी किंवा बाहेर काढण्यात येण्यापूर्वी जिवंतपणाच्या लक्षणांचा सर्वस्वी अभाव असणे, असा आहे—मग गर्भारपणाचा अवधी कितीही असो ;

(घ) "जिवंत अवस्थेतील जन्म" याचा अर्थ, जो धारणगर्भ मातेच्या उदरातून बाहेर पडल्यानंतर किंवा बाहेर काढण्यात आल्यानंतर श्वासोच्छ्वास करील किंवा जिवंतपणाचे अन्य कोणतेही लक्षण दर्शवील असा धारणगर्भ मातेच्या उदरातून संपूर्णपणे बाहेर पडणे किंवा बाहेर काढणे, असा आहे—मग गर्भारपणाचा अवधी कितीही असो ; आणि याप्रमाणे जन्मलेला प्रत्येक जीव हा जिवंत जन्मलेला असल्याचे समजण्यात येते ;

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(च). "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्याचा प्रशासक, असा आहे ;

(छ) "मृतावस्थेतील जन्म" याचा अर्थ, ज्या बाबतीत धारणगर्भाचा गर्भवास निदान विहित गर्भवहन-काळाइतका झालेला आहे त्या बाबतीत अशा जीवाचा गर्भमृत्यू असा आहे.

(२) एखाद्या क्षेत्रात अंमलात नसलेल्या कोणत्याही कायद्यासंबंधी या अधिनियमात आलेल्या कोणत्याही उल्लेखाचा त्या क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्या क्षेत्रामध्ये कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्या कायद्याचा उल्लेख म्हणून लावण्यात येईल.

## प्रकरण २ रे

## नोंदणी आस्थापना

३. (१) केंद्र शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे 'भारताचा महानिबंधक' म्हणून ओळखल्या जावयाच्या व्यक्तीची नियुक्ती करता येईल. भारताचा महानिबंधक.

(२) त्याचप्रमाणे महानिबंधकाची या अधिनियमाखालील जी कार्ये पार पाडण्याकरिता तो वेळोवेळी प्राधिकृत करील अशी कार्ये महानिबंधकाचे अधीक्षण व निदेशन याखाली पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ केंद्र सरकारला स्वतःस योग्य वाटतील अशा पदनामांशी व अशा अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(३) महानिबंधक ज्या राज्यक्षेत्रावर या अधिनियमाचा विस्तार आहे अशा राज्यक्षेत्रातील जन्ममृत्युंच्या नोंदणीसंबंधी सर्वसाधारण निदेश देऊ शकेल, आणि तो जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीच्या बाबतीत मुख्य निबंधकांच्या कार्यामध्ये समन्वय साधण्यासाठी व एकसूत्रता आणण्यासाठी उपाययोजना करील आणि उक्त राज्यक्षेत्रांमध्ये या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधी चाललेल्या कामाबाबत केंद्र शासनास वार्षिक अहवाल सादर करील.

मुख्य निबंधक. ४. (१) राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्याकरिता मुख्य निबंधकाची नियुक्ती करता येईल.

(२) त्याचप्रमाणे मुख्य निबंधकाची या अधिनियमाखालील जी कार्ये पार पाडण्याकरता तो वेळोवेळी प्राधिकृत करील अशी कार्ये मुख्य निबंधकाचे अधीक्षण व निदेशन या खाली पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाला स्वतःस योग्य वाटतील अशा पदनामानिशी व अशा अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(३) ह्या अधिनियमाचे उपबंध आणि त्याखाली केलेले नियम व आदेश यांची राज्य शासनाने काही निदेश दिले असल्यास त्यांच्या अधीनतेने, अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य निबंधक हे राज्यातील मुख्य कार्यकारी प्राधिकारी असेल.

(४) मुख्य निबंधक, नोंदणीपद्धती कार्यक्षम करण्यासाठी राज्यातील नोंदणीच्या कार्यामध्ये समन्वय साधण्याच्या, एकसूत्रता आणण्याच्या व यावर पर्यवेक्षण करण्याच्या दृष्टीने, योग्य ते निदेश देऊन किंवा अन्यथा उपाययोजना करील आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालांतरागणिक, राज्यातील या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधीचा अहवाल तयार करून कलम १९—पोट कलम (२) मधील निर्दिष्ट केलेल्या आकडेवार अहवालासह तो राज्य शासनास सादर करील.

नोंदणी विभाग. ५. राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्यातील क्षेत्राची, त्यास योग्य वाटेल अशा नोंदणी विभागांमध्ये विभागणी करता येईल आणि निरनिराळ्या नोंदणी विभागांकरिता निरनिराळे नियम करता येतील.

जिल्हा निबंधक. ६. (१) राज्य शासनाला, प्रत्येक महसुली जिल्ह्यासाठी जिल्हा निबंधकाची आणि आपणांस योग्य वाटेल इतक्या अपर जिल्हा निबंधकांची नियुक्ती करता येईल, आणि जिल्हा निबंधकाची जी कार्ये पार पाडण्यास जिल्हा निबंधक त्यांना वेळोवेळी प्राधिकृत करील अशी कार्ये ते, जिल्हा निबंधकाचे सर्वसाधारण नियंत्रण व निदेशन यांच्या अधीनतेने पार पाडतील.

(२) जिल्हा निबंधक हा, मुख्य निबंधकाच्या निदेशांच्या अधीनतेने, जिल्ह्यातील जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीच्या कामाचे अधीक्षण करील आणि तो, या अधिनियमाचे उपबंध व मुख्य निबंधकाने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, वेळोवेळी दिलेले आदेश यांची जिल्ह्यामध्ये अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल.

निबंधक. ७. (१) राज्य शासनास, नगरपालिका, पंचायत किंवा अन्य स्थानिक प्राधिकरण यांच्या अधिकारितेतील क्षेत्र किंवा अन्य कोणतेही क्षेत्र किंवा त्यांपैकी कोणतीही दोन अगर अधिक क्षेत्रे मिळून झालेल्या प्रत्येक स्थानिक क्षेत्रासाठी निबंधकांची नियुक्ती करता येईल :

परंतु, राज्य शासनास, नगरपालिका, पंचायत किंवा अन्य स्थानिक प्राधिकरण यांच्या बाबतीत, त्यांचा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल.

(२) प्रत्येक निबंधक, कलम ८ किंवा कलम ९ खाली त्याला देण्यात आलेल्या सर्व माहितीची नोंद, त्या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये फी किंवा मोबदला न घेता करील आणि तसेच आपल्या अधिकारितेमध्ये होणारा प्रत्येक जन्म व प्रत्येक मृत्यू यांची स्वतःला काळजीपूर्वक माहिती करून घेण्याची आणि त्याचप्रमाणे नोंद करण्याची आवश्यकता असलेल्या तपशिलाबाबत खातरजमा करून त्याची नोंदणी करण्याची कार्यवाही करील.

(३) प्रत्येक निबंधकाचे तो ज्या स्थानिक क्षेत्रासाठी नियुक्त करण्यात आला असेल त्या क्षेत्रात एकेक कार्यालय असेल.

(४) प्रत्येक निबंधक हा, मुख्य निबंधक निदेशित करील अशा दिवशी व अशा वेळी, जन्म व मृत्यू यांची नोंदणी करण्याच्या प्रयोजनार्थ आपल्या कार्यालयास उपस्थित राहील आणि आपले नाव व सोबत कोणत्या स्थानिक क्षेत्राकरिता 'निबंधक, जन्म व मृत्यू' म्हणून आपली नियुक्ती करण्यात आली आहे आणि कोणत्या दिवशी व कोणत्या वेळी आपण उपस्थित राहणार तो तपशील स्थानिक भाषेत नमूद करणारा फलक निबंधकांच्या कार्यालयाच्या बाहेरच्या दरवाजाजवळ ठळक जागी किंवा त्याच्या जवळपास लावण्याची व्यवस्था करील.

(५) मुख्य निबंधकाच्या पूर्वमान्यतेने निबंधकास दुय्यम निबंधकांची नियुक्ती करून त्यांच्याकडे आपल्या अधिकारितेतील विनिर्दिष्ट क्षेत्रांच्या संबंधातील आपले कोणतेही किंवा सर्व अधिकार आणि कर्तव्ये सोपवता येतील.

## प्रकरण ३ रे

### जन्म व मृत्यू यांची नोंदणी

८. (१) पुढील बाबतीत, कलम १६—पोटकलम (१) खाली राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यांविहित नोंद करणे आवश्यक असलेल्या निरनिराळ्या तपशिलाची माहिती खाली विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींनी, विहित करण्यात येईल अशा मुदतीत त्यांच्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे तोंडी किंवा लेखी देणे किंवा देण्याची व्यवस्था करणे हे त्यांचे कर्तव्य असेल— जन्म व मृत्यू यांची नोंदणी कोणत्या व्यक्तींनी करणे आवश्यक.

(क) खंड (ख) ते (ङ) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जागेहून अन्य अशा निवासी किंवा निवासेतर गृहामध्ये होणारे जन्म व मृत्यू यांच्या संबंधात जो गृहप्रमुख किंवा त्या गृहात एकाहून अधिक परिवार राहात असल्यास जो परिवारप्रमुख त्या गृहात किंवा परिवारात तसा प्रमुख म्हणून ओळखण्यात येत असेल तो, आणि ज्या मुदतीत जन्म किंवा मृत्यू यांचे वृत्त कळवावयाचे असते त्या मुदतीत एखाद्या वेळी तो प्रमुख उपस्थित नसेल तर, गृहामध्ये उपस्थित असलेला त्या प्रमुखाचा सर्वात जवळचा नातेवाईक आणि अशा कोणत्याही व्यक्तीच्या अभावी उक्त कालावधीत तेथे उपस्थित असलेली सर्वात वयस्क अशी प्रौढ पुरुष व्यक्ती ;

(ख) रुग्णालय, आरोग्य केंद्र, प्रसूती किंवा परिचार्या गृह किंवा अन्य तत्सम संस्था यांमधील जन्म व मृत्यू यांच्या संबंधात हुकूमतदार वैद्यकीय अधिकारी किंवा याबाबतीत त्यात प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती;

(ग) तुरुंगातील जन्म व मृत्यू यांच्या संबंधात, हुकूमतदार तुरुंगाधिकारी;

(घ) सराई, छत्र, वसतिगृहे, धर्मशाळा, खाणावळ, निवासगृह, पांथशाळा, बराक, ताडीचे दुकान किंवा सार्वजनिक राबत्याची जागा यांच्या त्या संबंधात त्या ठिकाणची हुकमतदार व्यक्ती ;

(ङ) सार्वजनिक ठिकाणी परित्यक्त अवस्थेत आढळलेले नवजात अर्भक किंवा मृतदेह यांच्या संबंधात खेडेगावच्या बाबतीत मुखिया किंवा अन्य तत्सम अधिकारी आणि इतरत्र पोलीस ठाण्याचा हुकूमतदार अधिकारी :

परंतु, ज्या व्यक्तीला असे अर्भक किंवा मृतदेह आढळून येईल, किंवा जिच्या ताब्यात असे अर्भक किंवा मृतदेह देण्यात येईल त्या व्यक्तीने पूर्वोक्त अशा मुखियाला किंवा अधिकाऱ्याला, ती गोष्ट कळवली पाहिजे ;

(च) अन्य कोणत्याही जागेच्या संबंधात, विहित करण्यात येईल अशी व्यक्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, नोंदणी विभागातील प्रचलित परिस्थिती लक्षात घेऊन, राज्य शासन, आदेशाद्वारे, पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गृहात घडलेल्या जन्म व मृत्यू या घटनाविषयीची माहिती त्या खंडात विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींच्याऐवजी त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा मुदतीपुरते याबाबतीत राज्य शासनाकडून पदनामाने विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने द्यावी किंवा देण्याची व्यवस्था करावी असे फर्मावू शकेल.

९. मळ्यामध्ये झालेले जन्म व मृत्यू यांच्या बाबतीत, मळ्याचा देखरेखदार, कलम ८ मध्ये निर्दिष्ट केलेली माहिती निबंधकाला देईल किंवा देण्याची व्यवस्था करील : मळ्यामधील जन्म व मृत्यू यांच्या संबंधातील विशेष उपबंध.

परंतु, कलम ८, पोटकलम (१) खंड (क) ते (च) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींनी आवश्यक तो तपशील मळ्याच्या देखरेखदाराला पुरवला पाहिजे.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "मळा" या शब्दप्रयोगाचा अर्थ, किमान चार हेक्टर इतक्या व्याप्तीची जी जमीन चहा, कॉफी, मिरे, रबर, वेलदोडा, सिंकोना किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी अन्य उत्पन्ने काढण्यासाठी तयार केली जाते किंवा जिच्यामध्ये ती उत्पन्ने प्रत्यक्षात काढली जातात अशी कोणतीही जमीन असा आहे, आणि "मळ्याचा देखरेखदार" या शब्दप्रयोगाचा अर्थ, मळ्यातील कामगार व काम यांवर हुकूमत किंवा देखरेख असलेली व्यक्ती, असा आहे—मग ती व्यवस्थापक किंवा देखरेखदार म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखली जावो.

१०. (१) (एक) जन्माच्या किंवा मृत्यूच्या वेळेची प्रसाविका किंवा अन्य कोणतीही वैद्यकीय किंवा आरोग्य उपचारक, जन्म व मृत्यू यांचे वृत्त कळवण्याचे आणि मृत्यूचे कारण प्रमाणित करण्याचे विवक्षित व्यक्तींचे कर्तव्य.

(दोन) मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागेचा रक्षक किंवा मालक किंवा अशा ठिकाणी उपस्थित राहण्यास स्थानिक प्राधिकरणाने जिला आवश्यक केले असेल अशी, कोणतीही व्यक्ती, किंवा

(तीन) राज्य शासन या बाबतीत जी व्यक्ती तिच्या पदनामाने विनिर्दिष्ट करील अशी अन्य कोणतीही व्यक्ती,

यांनी ज्या जन्माच्या किंवा मृत्यूच्या किंवा दोन्हींच्या वेळी तेथील व्यवस्था संभाळली किंवा ते हजर राहिले अथवा विहित करण्यात येईल अशा क्षेत्रांमध्ये जो घडून आला असा प्रत्येक जन्म किंवा मृत्यू किंवा दोन्ही यांचे वृत्त विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने निबंधकाला कळवणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

(२) कोणत्याही क्षेत्रात राज्य शासन विहित करण्यात येईल अशा व्यक्तीकडून व अशा नमुन्यात निबंधकाने मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र घ्यावे, असे त्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या याबाबतच्या सोयी विचारात घेऊन, आवश्यक करू शकेल.

(३) ज्या व्यक्तीच्या शेवटच्या आजारात वैद्यक व्यवसायीने तिच्यावर उपचार केले होते अशी कोणतीही व्यक्ती मृत्यू पावल्यास त्या प्रसंगी, तिच्या मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र घ्यावे असे पोटकलम (२) खाली राज्य शासनाने आवश्यक केले असेल तेथे, तो वैद्यक व्यवसायी त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर ताबडतोब या अधिनियमाखाली आवश्यक करण्यात आलेल्या व्यक्तीस, कोणतीही फी न आकारता, विहित नमुन्यात, आपल्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे मृत्यूचे कारण नमूद करणारे प्रमाणपत्र देईल; आणि असे प्रमाणपत्र मिळवून अशा व्यक्तीला या अधिनियमान्वये आवश्यक केल्याप्रमाणे, मृत्यूसंबंधातील माहिती देतेवेळी ते निबंधकाकडे सुपूर्द करावे लागेल.

**माहितीदाराने नोंद पुस्तकात सही करावयाची.** ११. या अधिनियमाखाली आवश्यक केल्याप्रमाणे, जिने निबंधकास कोणतीही तोंडी माहिती दिली असेल अशा प्रत्येक व्यक्तीला, याबाबतीत ठेवलेल्या नोंदपुस्तकात आपले नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे लागेल, आणि जर तिला लिहिता येत नसेल तर, अशा बाबतीत नोंद पुस्तकात तिचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण हा तपशील निबंधकाने भरल्यानंतर समोर अंगठ्याचा ठसा उमटवावा लागेल.

**नोंदणीतील नोंदीचे उतारे माहितीदारास द्यावयाचे.** १२. जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी पूर्ण होताच, निबंधक, कलम ८ किंवा कलम ९ खाली ज्या व्यक्तीनें माहिती दिली असेल तिला, नोंद पुस्तकातून अशा जन्माच्या किंवा मृत्यूच्या संबंधातील विहित तपशिलाचा उतारा आपल्या सहीनिशी विनामूल्य देईल.

**जन्म व मृत्यू यांची उशिरा झालेली नोंदणी.** १३. (१) ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची माहिती त्याकरिता विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर, पण तो घडल्यापासून तीस दिवसांच्या आत देण्यात आली असेल त्यांची नोंदणी, विहित करण्यात येईल अशी विलंब-फी भरण्यात आल्यावर करण्यात येईल.

(२) ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची माहिती तो घडल्यानंतर तीस दिवसांनंतर इतक्या उशिराने, पण एक वर्षाच्या आत निबंधकास देण्यात आली असेल त्याची नोंदणी, विहित प्राधिकरणाच्या लेखी परवानगीने व विहित फी भरण्यात आल्यावर आणि लेखप्रमाणक किंवा या बाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी याच्यासमोर केलेला प्रतिज्ञालेख सादर करण्यात आल्यावरच करण्यात येईल.

(३) ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची, तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्याची नोंदणी, जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करून पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी याने दिलेल्या आदेशावरून आणि विहित फी भरण्यात आल्यावरच करण्यात येईल.

(४) एखादी व्यक्ती, कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी तीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत करण्यास चुकल्याबद्दल तिच्याविरुद्ध जी कोणतीही कारवाई करण्यात येईल तिला या कलमाच्या उपबंधामुळे बाध येणार नाही आणि अशी कोणतीही कारवाई प्रलंबित असताना अशा कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी करता येईल.

**बालकाच्या नावाची नोंदणी.** १४. जेथे कोणत्याही बालकाच्या जन्माची त्याच्या नावाशिवाय नोंदणी करण्यात आली असेल तेथे, अशा बालकाच्या आई-वा-बापाने किंवा पालकाने बालकाच्या नावासंबंधातील माहिती निबंधकास विहित कालावधीत तोंडी किंवा लेखी कळवली पाहिजे आणि तदनंतर निबंधक अशा नावाची नोंदपुस्तकात नोंद करील आणि अशा नोंदीसमोर आद्याक्षरी करून दिनांक घालील.

**जन्म-मृत्यूच्या नोंद पुस्तकातील नोंद दुरुस्त किंवा रद्द करणे.** १५. निबंधकाने या अधिनियमाखाली ठेवलेल्या कोणत्याही नोंद पुस्तकातील जन्माची किंवा मृत्यूची कोणतीही नोंद प्ररुप किंवा आशय या दृष्टीने चुकीची आहे, अथवा ती कपटाने किंवा अयोग्य रीतीने करण्यात आली आहे असे, निबंधकाची खात्री होईल अशा रीतीने शाबीत करण्यात आले तर, कोणत्या शर्तीवर व कोणत्या परिस्थितीत अशा नोंदी दुरुस्त किंवा रद्द करता येतील त्यासंबंधी राज्य शासन करील अशा नियमांच्या अधीनतेने, निबंधकास मूळ नोंदीत कोणताही फेरबदल न करता, समासात योग्य ती नोंद करून ती चूक दुरुस्त करता येईल किंवा नोंद रद्द करता येईल आणि, तो समासातील नोंदीजवळ स्वाक्षरी करून त्याच्या जोडीला त्यावर दुरुस्तीचा किंवा रद्द केल्याचा दिनांक घालील.

## प्रकरण ४ थे

## अभिलेख व आकडेवारी ठेवणे

**निबंधकांनी विहित नमुन्यात नोंद पुस्तके ठेवावयाची.** १६. (१) प्रत्येक निबंधक, तो ज्याच्या संबंधात अधिकारितेचा वापर करीत असेल त्या नोंदणी क्षेत्राकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता विहित नमुन्यात जन्म-मृत्यूचे नोंद पुस्तक ठेवील.

(२) मुख्य निबंधक, वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा नमुन्यांनुसार व आदेशांनुसार, जन्म व मृत्यू यांच्या नोंदी करण्यासाठी पुरेशी नोंद पुस्तके छापण्याची व पुरवण्याची व्यवस्था करील ; आणि अशा नमुन्यांची स्थानिक भाषेतील एकेक प्रत प्रत्येक निबंधकाच्या कार्यालयाच्या बाहेरच्या दरवाजावरील किंवा जवळील एखाद्या ठळक ठिकाणी लावण्यात येईल.

१७. (१) फी व टपालहंशील देण्यासंबंधीचे नियम धरून राज्य शासनाने या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कोणत्याही व्यक्तीला— जन्म-मृत्यूची नोंद पुस्तके शोधून पाहणे.

(क) जन्म-मृत्यूंच्या नोंद पुस्तकातील कोणत्याही नोंदीचा निबंधकाकरवी शोध घेता येईल ; आणि

(ख) अशा नोंद पुस्तकातून कोणत्याही जन्माच्या किंवा मृत्यूच्या संबंधातील उतारा मिळवता येईल :

परंतु, कोणत्याही मृत्यूच्या संबंधी कोणत्याही व्यक्तीस दिलेल्या कोणत्याही उताऱ्यावरून, नोंद पुस्तकात नमूद केला तसा मृत्यूच्या कारणासंबंधीचा तपशील उघड होता कामा नये.

(२) या कलमान्वये दिलेले सर्व उतारे हे, निबंधक, किंवा 'भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) कलम ७६ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे असे उतारे देण्यास राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी याच्याकडून प्रमाणित करण्यात येतील आणि ती नोंद ज्याच्याशी संबंधित असेल तो जन्म किंवा मृत्यू याबाबतच्या शाबितीसाठी ते पुराव्यात स्वीकारार्ह असतील.

१८. जिल्हा निबंधक विनिर्दिष्ट करील अशा पद्धतीने आणि अशा प्राधिकरणाकडून नोंदणी कार्यालयांची पाहणी केली जाईल आणि त्यामध्ये ठेवलेल्या नोंद पुस्तकांची तपासणी केली जाईल. नोंदणी कार्यालयांची पाहणी.

१९. (१) प्रत्येक निबंधक, त्याने ठेवलेल्या नोंद पुस्तकातील जन्म-मृत्यूंच्या नोंदींसंबंधीचे प्रतिवेदन विहित केले जाईल अशा कालांतराणिक आणि अशा नमुन्यात मुख्य निबंधकाकडे किंवा त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे पाठवील. निबंधकांनी नियतकालिक प्रतिवेदने संकलनासाठी मुख्य निबंधकाकडे पाठवावयाची.

(२) मुख्य निबंधक हा, निबंधकांनी सादर केलेल्या प्रतिवेदनांमधील माहितीचे संकलन करील आणि त्या वर्षातील नोंदणी केलेले जन्म व मृत्यू यासंबंधीचा आकडेवार अहवाल, विहित केले जाईल अशा कालांतराणिक आणि अशा नमुन्यात जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करील.

## प्रकरण ५ वे

## संकीर्ण

२०. (१) केंद्र शासन, प्रावाबतीत करील अशा नियमांच्या अधीनतेने, महानिबंधक हा 'नागरिकत्व अधिनियम, १९५५' (१९५५ चा ५७) याखाली भारतीय कॉन्सुलेटमधील नागरिकांच्या नोंदणीसंबंधी केलेल्या नियमांखाली त्याला मिळालेल्या भारताबाहेरील भारतीय नागरिकांच्या जन्म-मृत्यूसंबंधीच्या माहितीची नोंदणी करवील आणि अशी प्रत्येक नोंदणी या अधिनियमाखाली रीतसर केली असल्याचे ही मानण्यात येईल. भारताबाहेरील नागरिकांच्या जन्म-मृत्यूंच्या नोंदणीसंबंधी विशेष उपबंध.

(२) भारताबाहेर जन्मलेल्या ज्या बालकासंबंधी पोटकलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे माहिती मिळालेली नाही अशा कोणत्याही बालकाच्या बाबतीत, जर त्याचे आईबाप भारतात स्थायिक होण्याच्या हेतुने भारतात परत आले तर, बालकाचे भारतात आगमन झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांत कधीही त्यांना, जणू काही ते बालक भारतात जन्मले असावे त्याप्रमाणे त्याच रीतीने या अधिनियमाखाली त्या बालकाच्या जन्माची नोंदणी करवून घेता येईल आणि कलम १३ मधील उपबंध पूर्वोक्त साठ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर अशा बालकाच्या जन्माच्या बाबतीत लागू होतील.

२१. निबंधक कोणत्याही व्यक्तीला, ती जेथे राहात असेल त्या स्थानिक भागातील एखादा जन्म किंवा मृत्यू याच्या संबंधात तिला ज्ञात असलेली कोणतीही माहिती सादर करण्यास तोंडी किंवा लेखी आज्ञा करू शकेल आणि ती व्यक्ती अशा आज्ञेचे पालन करण्यास बांधलेली असेल. जन्म किंवा मृत्यू यासंबंधीची माहिती मिळविण्याची निबंधकाची शक्ती.

२२. केंद्र शासन या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा आदेशाचे कोणतेही उपबंध यांची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक वाटतील असे निदेश कोणत्याही राज्य शासनाला देऊ शकेल. निदेश देण्याची शक्ती.

२३. (१) जर कोणतीही व्यक्ती,— दंड.

(क) कलम ८ आणि ९ च्या कोणत्याही उपबंधाखाली जी माहिती देणे हे तिचे कर्तव्य असेल अशी कोणतीही माहिती देण्यास वाजवी कारणाशिवाय चुकेल तर ; किंवा

(ख) जो तपशील माहीत असणे व नोंदवणे आवश्यक आहे अशा तपशिलापैकी कोणत्याही बाबीसंबंधीची जी माहिती खोटी असल्याचे स्वतःला माहीत आहे किंवा तसे ती स्वतः समजते ती माहिती जन्म-मृत्यूच्या नोंद पुस्तकात समाविष्ट करण्यासाठी देईल किंवा देववील तर ; किंवा

(ग) कलम ११ द्वारे आवश्यक केल्याप्रमाणे नोंद पुस्तकात आपले नाव, वर्णन आणि राहण्याचे ठिकाण लिहिण्यास किंवा अंगठ्याचा ठसा उमटवण्यास नकार देईल तर, ती पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(२) जो कोणताही निबंधक किंवा उप निबंधक, त्याच्या अधिकारितेत घडणाऱ्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची नोंद करण्याबाबत किंवा कलम १९ च्या पोटकलम (१) द्वारे आवश्यक केलेली कोणतीही प्रतिवेदने सादर करण्याबाबत वाजवी कारणाशिवाय उपेक्षा करील किंवा नकार देईल तो, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(३) जो कोणताही वैद्यक व्यवसायी, कलम १०-पोटकलम (३) खाली प्रमाणपत्र देण्याबाबत उपेक्षा करील किंवा नकार देईल तो आणि जी व्यक्ती असे प्रमाणपत्र सुपूर्द करण्याबाबत उपेक्षा करील किंवा नकार देईल ती व्यक्ती, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(४) या अधिनियमाच्या ज्या कोणत्याही उपबंधाच्या उल्लंघनाबद्दल या कलमामध्ये कोणत्याही दंडाची उपबंध केलेली नाही अशा उपबंधाचे जी व्यक्ती वाजवी कारणाशिवाय उल्लंघन करील ती व्यक्ती, दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडद्रव्यास पात्र होईल.

(५) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' *(१८९८ चा ५) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखाली कोणत्याही अपराधाची दंडाधिकाऱ्यांकडून संक्षिप्तरित्या संपरीक्षा केली जाईल.

**अपराध आपसात मिटवण्याची शक्ती.**

२४. (१) विहित करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीनतेने, याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे मुख्य निबंधकाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला या अधिनियमाखाली फौजदारी कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, ज्या व्यक्तीने या अधिनियमाखालील अपराध केला आहे किंवा केला असल्याचा वाजवी संशय आहे त्या व्यक्तीकडून तोड म्हणून जास्तीत जास्त पन्नास रुपये इतकी रक्कम स्वीकारता येईल.

(२) अशी रक्कम भरण्यात आल्यानंतर, अशा व्यक्तीला विनादोषारोप सोडण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध अशा अपराधाच्या संबंधात पुढील कार्यवाही केली जाणार नाही.

**खटल्यास मंजुरी.**

२५. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल कोणताही खटला या बाबतीत मुख्य निबंधकाने दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्या-खेरीज कोणालाही गुदरता येणार नाही.

**निबंधक आणि दुय्यम निबंधक यांना लोक सेवक मानावयाचे.**

२६. सर्व निबंधक आणि दुय्यम निबंधक, ते या अधिनियमाच्या उपबंधांना किंवा त्याखाली केलेल्या नियमांना किंवा आदेशांना अनुसरून कार्य करीत असताना किंवा तसे म्हणून कार्य करीत असताना 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**शक्तींचे प्रत्यायोजन.**

२७. राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमा-खालील (कलम ३० खाली नियम करण्याचा अधिकार खेरीज करून) किंवा त्याअन्वये केलेल्या नियमाखाली त्याने वापरण्याजोगा असा कोणताही अधिकार हा, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा काही शर्ती असल्यास त्यांच्या अधिनतेने, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे राज्य शासनाला दुय्यम असणाऱ्या अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकाऱ्यालाही वापरता येईल.

**सद्भावनापूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.**

२८. (१) या अधिनियमाला किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाला किंवा आदेशाला अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल शासन, महा निबंधक, कोणताही निबंधक अथवा या अधिनियमाखाली कोणताही अधिकार वापरणारी किंवा कोणतेही कर्तव्य पार पाडणारी कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) या अधिनियमाला किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाला किंवा आदेशाला अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करावयाचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे घडलेल्या किंवा घडण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल शासनाविरुद्ध दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**हा अधिनियम, १८८६ चा अधि-नियम ६ याला न्यूनकारी नाही.**

२९. या अधिनियमातील कोणतीही गोष्ट 'जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी अधिनियम, १८८६' यांच्या उपबंधांना न्यूनकारी आहे असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

---

*आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) पहा.

३०. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी केंद्र सरकारच्या मान्यतेने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी तरतुदींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येतील :—

(क) या अधिनियमाखाली ठेवावयाच्या जन्म-मृत्यू नोंद पुस्तकांचे नमुने;

(ख) कलम ८ खाली निबंधकाला किती कालावधीत व कोणत्या रीतीने माहिती द्यावयाची;

(ग) कलम १० च्या पोटकलम (१) खाली जन्म-मृत्यूची वार्ता किती कालावधीत व कोणत्या रीतीने कळवावी लागेल;

(घ) मृत्यूच्या कारणाबाबतचे प्रमाणपत्र कोणत्या व्यक्तीकडून आणि कोणत्या नमुन्यात मिळवावे लागेल;

(ङ) कलम १२ खाली ज्यातील उतारा देता येईल तो तपशील;

(च) कलम १३ च्या पोटकलम (२) खाली जन्म किंवा मृत्यू यांच्या नोंदणीसाठी कोणते प्राधिकरण परवानगी देऊ शकेल;

(छ) कलम १३ खाली करावयाच्या नोंदणीसाठी द्यावी लागणारी फी;

(ज) कलम ४ च्या पोटकलम (४) खाली मुख्य निबंधकाने अहवाल सादर करणे;

(झ) जन्म-मृत्यूची नोंद पुस्तके शोधून पाहणे आणि अशा शोधासाठी आणि नोंद पुस्तकातून उतारे दिल्याबद्दल द्यावी लागणारी फी;

(ञ) कलम १९ खाली प्रतिवेदने आणि आकडेवार अहवाल कोणत्या नमुन्यांत व किती कालांतरांनंतर सादर करून प्रकाशित केले जातील;

(ट) निबंधकांनी ठेवलेली नोंद पुस्तके आणि अन्य अभिलेख सांभाळून ठेवणे, ते हजर करणे आणि त्यांचे हस्तांतर करणे;

(ठ) जन्म-मृत्यूंच्या नोंद पुस्तकांमधील चुकांची दुरुस्ती करणे आणि नोंदी रद्दबातल करणे;

(ड) जी बाब विहित करावयाची आहे किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

[1][(३) राज्य शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

३१. (१) कलम २९ च्या उपबंधांच्या अधीनतेने, हा अधिनियम कोणत्याही राज्यामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये अंमलात आल्याच्या दिनांकी व तेव्हापासून या अधिनियमाच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींशी संबंधित असेल तेवढा तेथे अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचा भाग, अशा राज्यामध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या भागामध्ये निरसित ठरेल. निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले तरीही, अशा कोणत्याही कायद्याखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई (दिलेला कोणताही अनुदेश किंवा निदेश, काढलेला कोणताही विनियम किंवा नियम किंवा आदेश यासह) या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, जणू काही अशी गोष्ट किंवा अशी कारवाई करण्याच्या वेळी पूर्वोक्त उपबंध अंमलात असावेत त्याप्रमाणे ती त्याखाली केली असल्याचे मानण्यात येईल आणि ती गोष्ट किंवा कारवाई या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा कारवाईमुळे ती निष्प्रभावी होईपर्यंत अंमलात राहील.

३२. या अधिनियमाच्या उपबंधांची एखाद्या राज्यात अंमलबजावणी करताना एखाद्या क्षेत्राला ते लागू करण्याबाबत एखादी अडचण उद्भवली तर, राज्य शासन केंद्र सरकारच्या मान्यतेने आदेशाद्वारे अडचणींच्या निवारणार्थ त्याला आवश्यक किंवा उचित वाटतील असे, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसलेले उपबंध करू शकेल किंवा असे निदेश देऊ शकेल : अडचणींचे निवारण करण्याची शक्ती.

परंतु, राज्यातील कोणत्याही क्षेत्रासंबंधी या कलमाखाली कोणताही आदेश त्या क्षेत्रात हा अधिनियम अंमलात येईल त्या दिनांकापासून दोन वर्षे संपल्यानंतर काढण्यात येणार नाही.

---

१. १९८६ चा अधिनियम क्रमांक ४, कलम २ व अनुसूची यांद्वारे समाविष्ट केले (दिनांक १५ मे, १९८६ रोजी व तेव्हापासून.)

### महाराष्ट्र राज्यामध्ये या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधी

हा अधिनियम दिनांक १ एप्रिल १९७० रोजी व तेव्हापासून पुढील राज्यात आणि संघ राज्य-क्षेत्रात सर्वत्र अंमलात येईल ; अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ४६१, दिनांक ७ मार्च १९७०, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, उप विभाग ३ (एक), पृष्ठ ९६६ पहा :—

**राज्ये**

१. आंध्रप्रदेश
२. बिहार
३. गुजरात
४. हरयाणा
५. केरळ
६. मध्य प्रदेश
७. महाराष्ट्र
८. म्हैसूर
९. ओरिसा
१०. पंजाब
११. राजस्थान
१२. तामिळनाडू
१३. उत्तर प्रदेश

**संघ राज्यक्षेत्रे**

१. चंदीगढ
२. दादरा व नगर हवेली
३. हिमाचल प्रदेश
४. लखदीव, मिनिकॉय व अमिनदिवी बेटे

## जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

## THE REGISTRATION OF BIRTHS AND DEATHS ACT, 1969

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| आकडेवार अहवाल .. | statistical report | [क. १९(२)] |
| एकसूत्रता आणणे .. | unity | [क. ४(४)] |
| खाणावळ .. | boarding-house | [क. ८(१) (घ)] |
| गर्भमृत्यू .. | foetal death | [क. २ (ग)] |
| गर्भवहन-काळ .. | period of gestation | [क. २ (छ)] |
| गृहप्रमुख .. | head of the house | [(क. ८(१) (क)] |
| जन्म .. | birth | [क. २ (क)] |
| जिल्हा निबंधक .. | District Registrar | [क. ६(१)] |
| जिवंत अवस्थेतील जन्म .. | live-birth | [क. २ (घ)] |
| जिवंत जन्मलेला .. | live-born | [क. २ (घ)] |
| तपशील .. | addition | [(क. ७ (४)] |
| (मळ्याचा) देखरेखदार .. | Superintendent (of the plantation) | [क. ९-स्पष्टीकरण] |
| दुय्यम निबंधक .. | Sub-Registrar | [क. ७(५)] |
| धारणगर्भ .. | product of conception | [क. २ (ग)] |
| निबंधक, जन्म व मृत्यू .. | Registrar of Births and Deaths | [क. ७(४)] |
| निवासगृह .. | lodging house | [क ८(१) (घ) |
| नोंदणी विभाग .. | registration division | [क. ५] |
| परिवार .. | household | [क. ८(१) (क)] |
| परिवार प्रमुख .. | head of the household | [क. ८(१- (क)] |
| पर्यवेक्षण करणे .. | supervise | [क. ४(४)] |
| पांथशाला .. | tavern | [क. ८(१) (घ)] |
| प्रतिवेदन .. | return | [क. १९(१)] |
| प्रसाविका .. | midwife | [क. १०(१) (एक)] |
| फी किंवा मोबदला .. | fee or reward | [क. ७(२)] |
| बराक .. | barrack | [क. ८(१) (घ)] |
| बाहेर काढणे .. | extraction | [क. २ (ग)] |
| बाहेर पडणे .. | expulsion | [क. २ (ग)] |
| महानिबंधक .. | Registrar-General | [क. ३(२)] |
| मळा .. | plantation | [क. ९-स्पष्टीकरण] |
| माहितीदार .. | informant | [क. ११-सटीप] |
| मुखिया .. | headman | [क. ८(१) (घ)] |
| मुख्य कार्यकारी प्राधिकारी .. | chief executive authority | [क. ४(३)] |
| मुख्य निबंधक .. | Chief Registrar | [क. ४(१)] |
| मृतावस्थेतील जन्म .. | still-birth | [क. २ (छ)] |
| मृत्यू .. | death | [क. २ (ख)] |
| रक्षक .. | keeper | [क. १०(१) (दोन)] |
| राहण्याचे ठिकाण .. | place of abode | [क. ११] |
| लेखप्रमाणक .. | notary public | [क. १३(२)] |
| विनादोषारोप सोडणे .. | discharge | [क. २४(२)] |
| वैद्यकीय किंवा आरोग्य उपचारक .. | medical or health attendant | [क. १०(१) (एक)] |
| समन्वय साधणे .. | co-ordinate | [क. ४(४)] |
| सराई .. | choultry | [क. ८ (१) (घ)] |
| सार्वजनिक राबत्याची जागा .. | place of public resort | [क. ८ (१) (घ)] |

# THE REGISTRATION OF BIRTHS AND DEATHS ACT, 1969

## जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| addition | तपशील | [S.7(4)] |
| barrack | बराक | [S.8(1))(d)] |
| birth | जन्म | [S.2(a)] |
| boarding-house | खाणावळ | [S.8(1)(d)] |
| chief executive authority | मुख्य कार्यकारी प्राधिकारी | [S.4(3)] |
| Chief Registrar | मुख्य निबंधक | [S.4(1)] |
| choultry | सराई | [S.(1)(d)] |
| co-ordinate | समन्वय साधणे | [S.4(4)] |
| death | मृत्यू | [S.2(b)] |
| discharge | विनादोषारोप सोडणे | [S.24(2)] |
| District Registrar | जिल्हा निबंधक | [S.6(1)] |
| expulsion | बाहेर पडणे | [S.2(c)] |
| extraction | बाहेर काढणे | [S.2(c)] |
| fee or reward | फी किंवा मोबदला | [(S.7(2)] |
| foetal death | गर्भ मृत्यू | [S.2(c)] |
| headman | मुखिया | [S.8(1)(d)] |
| head of the house | गृह प्रमुख | [S.8(1)(a)] |
| head of the household | परिवार प्रमुख | [S.8(1)(a)] |
| household | परिवार | [S.8(1)(1)] |
| keeper | रक्षक | [S 10(1)(ii)] |
| informant | माहितीदार | [S.11-m.n.] |
| live-birth | जिवंत अवस्थेतील जन्म | [S.2(d)] |
| live-born | जिवंत जन्मलेला | [S.2(d)] |
| lodging house | निवासगृह | [S.8(1)(d)] |
| medical or health attendant | वैद्यकीय किंवा आरोग्य उपचारक | [S.10(1)(i)] |
| midwife | प्रसाविका | [S.10(1)(i)] |
| notary public | लेख प्रमाणक | [S.13(2)] |
| period of gestation | गर्भवहन-काळ | [S.2(g)] |
| place of abode | राहण्याचे ठिकाण | [S.11] |
| place of public resort | सार्वजनिक राबत्याची जागा | [S.8(1)(d)] |
| planation | मळा | [S.9-expl.] |
| product of conception | धारणगर्भ | [S.2(c)] |
| Registar-General | महानिबंधक | [S.3(2)] |
| Registarar of Birth and Deaths | निबंधक, जन्म व मृत्यू | [S.7(4)] |
| registration division | नोंदणी विभाग | [S.5] |
| return | प्रतिवेदन | [S.19(1)] |
| statistical report | आकडेवार अहवाल | [S.19(2)] |
| still-birth | मृतावस्थेतील जन्म | [S.2(g)] |
| sub-Registrar | दुय्यम निबंधक | [S.7(5)] |
| superintendent (of the plantation) | (मळ्याचा) देखरेखदार | [(S.9-expl.] |
| supervise | पर्यवेक्षण करणे | [S.4(4)] |
| tavern | पांथशाला | [S.8(1)(d)] |
| unify | एकसूत्रता आणणे | [S.4(4)] |